दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. ०९ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १४० ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रु. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

## खेळाडूंच्या नोकरीतील 5% आरक्षणाचे सुधारित धोरण मंजूर

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत खेळाडूंच्या शासकीय, निमशासकीय तसेच इतर क्षेत्रातील नोकरीसाठीच्या ५ टक्के आरक्षणाबाबत सुधारित धोरणाला मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे यशस्वी खेळाडूंना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठीच्या आरक्षण धोरणात बदल करण्यात आला असून, यापूर्वीचे सर्व शासन निर्णय, शुद्धिपत्रके, परिपत्रके आणि पत्रे रद्द करण्यात आली आहेत.

## 25 हजार झोपडीधारकांना दिलासा!

**मुंबई :** परिशिष्ट-२ नंतर अपात्र ठरलेल्या झोपडीचे हस्तांतरण झाल्यामुळे अभय योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या झोपडीधारकांना दिलासा देण्यासाठी योजनेचा विस्तार करण्याचे निर्देश पालकमंत्री, मुंबई उपनगर तसेच माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. सन २००० पूर्वीच्या तसेच सन २००० ते २०११ या कालावधीतील झोपडीधारकांना, केवळ हस्तांतरणाच्या कारणामुळे अभय योजनेपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशा सूचना मंत्री शेलार यांनी दिल्या.

# नोकरांनीच लुटले मालकाचे गोडाऊन; 122 एलईडी टीव्ही जप्त

## जवाहरनगर पोलिसांचा मोठा पर्दाफाश; ४४.४५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत, तीन आरोपी जेरबंद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मालकाच्या गोडाऊनमध्ये काम करत असतानाच तब्बल दोन वर्षांपासून एक-दोन टीव्ही करत चोरी करून ते परस्पर विकणाऱ्या नोकरांच्या टोळीचा जवाहरनगर पोलिसांनी पर्दाफाश केला. पोलिसांनी तीन आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून आणि त्यांनी विक्री केलेल्या विविध ठिकाणांहून १२२ एलईडी टीव्ही, टीव्हीचे सुटे भाग आणि चोरीसाठी वापरलेले वाहन असा तब्बल ४४ लाख ४४ हजार ९७७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

व्यापारी रविंद्रसिंह जसवंतसिंह जोहर यांच्या सिंधी कॉलनीतील गोडाऊन तसेच मोंढा नाका येथील निशा प्राईड इमारतीतून सन २०२४ पासून २५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत वेगवेगळ्या आकाराचे सुमारे १५० एलईडी टीव्ही आणि टीव्हीचे सुटे भाग चोरीला गेले होते. या मुद्देमालाची किंमत सुमारे ३४ लाख रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले. याप्रकरणी २५ ऑगस्ट रोजी जवाहरनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले. पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ रत्नाकर नवले, सहायक पोलीस आयुक्त मनीष कल्याणकर व सहायक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा सय्यद मजहर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले.

गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी मनिष दिलीप नरवडे (२६), अकबर शेख मोहम्मदअल्ली शेख (५५) आणि राजेंद्रकुमार फुलचंद परदेशी (५३) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गोडाऊनमधून २०२४ पासून टप्प्याटप्प्याने एलईडी टीव्ही चोरी केल्याची कबुली दिली. चोरीचे टीव्ही छत्रपती संभाजीनगर शहर व ग्रामीण भागासह जालना आणि नाशिक येथे ओळखीच्या व्यक्तींमार्फत कमी किमतीत विकल्याचेही त्यांनी सांगितले.

आरोपींकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी विविध ठिकाणी छापे टाकून १२२ एलईडी टीव्ही व सुटे भाग जप्त केले. यासोबतच गुन्ह्यात वापरलेले वाहनही हस्तगत करण्यात आले. या कारवाईमुळे गोडाऊनमधील चोरीचा मोठा प्रकार उघडकीस आला आहे.

ही कारवाई मपोउपनि. राधा लाटे, पोउपनि. रविकुमार गादेकर, सफौ चंद्रकांत पोटे, पोह रावते तसेच पोलीस अंमलदार विजेश चव्हाण, राजेंद्र शिंदे, मारुती गोरे, कपिल खिल्लारे व सुरे यांच्या पथकाने केली.

## थोडक्यात वार्ता

### 'ब्रिक्स' परिषदेत रंगणार मोदी-पुतिन द्विपक्षीय चर्चा

**नवी दिल्ली :** नवी दिल्लीत आयोजित होणाऱ्या १८ व्या 'ब्रिक्स २०२६' (BRICS Summit) शिखर परिषदेच्या निमित्ताने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM Narendra Modi) आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन (Vladimir Putin) यांच्यात येत्या ११ सप्टेंबर (शुक्रवार) रोजी अत्यंत महत्त्वाची द्विपक्षीय बैठक होणार आहे. मॉस्को येथून ऑनलाईन पत्रकार परिषदेत बोलताना क्रेमलिनचे (रशियन अध्यक्षांचे कार्यालय) प्रवक्ते डिमित्री पेस्कोव्ह यांनी या नियोजित बैठकीची अधिकृत माहिती दिली. या बैठकीत भारत आणि रशियामधील आंतरराष्ट्रीय संबंध अधिक दृढ करण्यासोबतच लष्करी व आर्थिक करारांवर सखोल चर्चा केली जाणार आहे. या द्विपक्षीय बैठकीच्या मुख्य अजेंड्यावर रशियाकडून भारताला 'Su-57' ही अत्याधुनिक पाचव्या पिढीतील लढाऊ विमाने विकण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव असणार आहे, असे पेस्कोव्ह यांनी स्पष्ट केले. यासोबतच दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार, ऊर्जा क्षेत्र आणि आर्थिक सहकार्य वाढवण्यावर विशेष भर दिला जाईल. याच दरम्यान, रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्के आयात शुल्क (Tariff) लादण्याच्या अमेरिकेच्या प्रस्तावित निर्णयावर रशियाने तीव्र आक्षेप घेतला आहे. अमेरिकेचे हे पाऊल पूर्णपणे बेकायदेशीर, चुकीचे आणि अमान्य असल्याचे पेस्कोव्ह यांनी स्पष्टपणे सांगितले.

### पावसाचा खंड पडलेल्या विभागांतील पिकांचे सर्वेक्षण करा! : मुख्यमंत्री

मुंबई : राज्यातील काही भागांत पावसाने दीर्घ खंड दिल्याने पिके अडचणीत आली असताना, अशा भागांतील नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करून पंचनामे करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील ज्या भागांत पावसाची मोठी तूट आहे, तेथे पिकांची स्थिती तपासून आवश्यक ती मदत करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पिके वाचविण्यासाठी दिवसाला १२ तास वीज देण्याबरोबरच जळालेले रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) तातडीने बदलण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पीकपाहणी आणि राज्यातील पर्जन्यमानाचा आढावा घेण्यात आला. ज्या ठिकाणी पावसाचा मोठा खंड पडला आहे आणि त्यामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे, त्या भागांचे सर्वेक्षण सुरू करण्याचे आदेश मुख्य सचिवांना देण्यात आल्याचे बावनकुळे यांनी बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले. राज्यातील काही भागांत पावसाची तूट लक्षणीय आहे. विदर्भात सुमारे ३५ टक्के पाऊस कमी झाला असून, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण कमी आहे. पावसाच्या दीर्घ खंडामुळे अनेक ठिकाणी पिके आणि पाण्याची उपलब्धता अडचणीत आली आहे.

त्यामुळे एकीकडे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे, तर दुसरीकडे पिकांना वाचविण्यासाठी आवश्यक ते सिंचन उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# मराठवाडा दुष्काळाच्या छायेत; तातडीने दुष्काळ जाहीर करा!

## शेतकऱ्यांना विशेष आर्थिक मदत पॅकेज देण्याची खासदार संदिपान भूमरे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात यंदा पावसाने मोठी ओढ दिल्याने अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसातील दीर्घ खंड, अपुरा पाऊस आणि जमिनीतील घटता ओलावा यामुळे खरीप पिके संकटात आली असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण मराठवाडा दुष्काळग्रस्त घोषित करावा आणि शेतकऱ्यांसाठी तातडीने विशेष आर्थिक मदत पॅकेज जाहीर करावे, अशी आग्रही मागणी खासदार संदिपान भूमरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



भूमरे यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रातून मराठवाड्यातील परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. पावसाच्या लहरीपणामुळे अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली असून काही ठिकाणी पिके करपण्याच्या स्थितीत आहेत. पेरणी, बियाणे, खते, औषधे आणि मशागतीवर शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. मात्र, पावसाअभावी हा खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सर्व तालुक्यांचा तातडीने आढावा घ्या

छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाड्यातील सर्व तालुक्यांमध्ये पावसाचे प्रमाण, पेरणीची स्थिती, पिकांची वाढ, पाणीसाठा, जमिनीतील ओलावा आणि संभाव्य पीक नुकसान यांचा शास्त्रीय पद्धतीने तातडीने आढावा घ्यावा. त्यानंतर दुष्काळ जाहीर करण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी भूमरे यांनी केली आहे.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी उपाययोजना

पीक नुकसानीचे तातडीने पंचनामे करून प्रत्यक्ष नुकसानीच्या आधारे आर्थिक मदत द्यावी, पीक विम्याची भरपाई तत्काळ मंजूर करावी, पीक कर्जवसुलीस स्थगिती देऊन कर्जाचे पुनर्गठन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच वीज बिल व पाणीपट्टीत सवलत, जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पुढील हंगामासाठी अनुदानित बियाणे, खते व कृषी निविष्ठा उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली आहे. "मराठवाड्यातील शेतकरी मोठ्या संकटात आहे. शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून युद्धपातळीवर निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांना केवळ आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष आणि तातडीची आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे," असे भूमरे यांनी पत्रातून स्पष्ट केले.

# ॲमेझॉन आणि इन्स्टामार्टला दणका!

## बंगळुरूमध्ये अन्नसुरक्षा विभागाची धाड; 1.38 कोटींचा माल जप्त!

**बंगळुरू :** बंगळुरू शहरात (Bengluru News) अन्न आणि औषध प्रशासनाने ऑनलाईन डिलिव्हरी प्लॅटफॉर्म्स (Online Delivery Platfort) आणि त्यांच्या गोदामांवर (डार्क स्टोअर्स) एक मोठी धाड टाकली आहे. या कारवाईदरम्यान मुदत संपलेले (एक्सपायर झालेले) आणि नियमांनुसार लेबल नसलेले तब्बल १.३८ कोटी रुपयांचे खाद्यपदार्थ जप्त करण्यात आले आहेत. यासोबतच कोणतीही परवानगी किंवा परवाना नसताना साठवून ठेवलेली सुमारे ४ लाख रुपयांची औषधेही अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतली आहेत.

कर्नाटकचे आरोग्यमंत्री यू. टी. खादर यांच्या निर्देशानुसार 'अन्न सुरक्षा आणि औषध प्रशासन' विभागाने ही विशेष मोहीम राबवली. अन्न सुरक्षा कायदा २००६ आणि औषध व प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत ही तपासणी करण्यात आली. ऑनलाईन ॲप्सद्वारे विकल्या जाणाऱ्या वस्तूंवर उत्पादनाची तारीख, एक्सपायरी डेट आणि शेल्फ लाईफ या गोष्टी स्पष्टपणे लिहिल्या आहेत की नाही, हे अधिकाऱ्यांनी तपासले. तसेच औषधांची विक्री करण्यासाठी लागणारा अधिकृत परवाना या कंपन्यांकडे आहे का, याचीही पडताळणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान ॲमेझॉनच्या दोन मोठ्या केंद्रांवर कारवाई करण्यात आली. येथे चुकीचे लेबल असलेले १४ लाख रुपयांचे आणि एक्सपायर झालेले १० लाख रुपयांचे अन्नपदार्थ जप्त केले. तसेच परवान्याशिवाय साठवलेली २.४५ लाख रुपयांची औषधे जप्त करण्यात आली.

या केंद्रातून १९ लाखांचे चुकीचे लेबल असलेले आणि १३ लाखांचे मुदत संपलेले खाद्यपदार्थ जप्त केले. तसेच १.५७ लाख रुपयांचा विनापरवाना औषधसाठा हस्तगत करण्यात आला.

# 'नाराज फुफाजींना आता काम मिळालं!'

## PM Modi यांची विरोधकांवर तुफान टोलेबाजी

**वडोदरा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM Narendra Modi) यांनी गुजरातमधील वडोदरा येथे आयोजित 'नमो फॉर विकसित भारत' या कार्यक्रमात ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन केले. या सोहळ्यात आपल्या सरकारच्या विकासकामांचा लेखाजोखा मांडताना त्यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. सरकारच्या विकास धोरणांवर शंका उपस्थित करणाऱ्यांना टोला लगावताना त्यांनी 'नाराज फुफाजी' असा उल्लेख केला, ज्यामुळे राजकीय वर्तुळात नवा वाद निर्माण झाला आहे.

या कार्यक्रमात पंतप्रधानांनी २,८०० किलोमीटर लांबीच्या विशेष रेल्वे मालवाहतूक मार्गाचे (डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर) उद्घाटन केले आणि याला '२१ व्या शतकातील ऐतिहासिक टप्पा' म्हटले. या प्रकल्पाच्या निमित्ताने त्यांनी भाजप आणि काँग्रेस सरकारच्या कामातील फरक दाखवून दिला. अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात या प्रकल्पाची पायाभरणी झाली होती, मात्र २००४ ते २०१४ या यूपीए सरकारच्या १० वर्षांच्या काळात हा प्रकल्प रखडला होता. २०१४ मध्ये भाजप सरकार सत्तेत आल्यावरच या कामाला खरी गती मिळाली, असे पंतप्रधान म्हणाले.

या प्रकल्पाच्या फायद्यांवर प्रश्न विचारणाऱ्यांवर टीका करताना पंतप्रधान म्हणाले, "काही नाराज फुफाजी ओरडत होते की आता ट्रक ड्रायव्हर्सचे काय होणार? पण या फुफाजींना आता काम मिळाले आहे." स्वातंत्र्यानंतरही ज्या भागात रेल्वे लाईन पोहोचली नव्हती, तेथे हा कॉरिडॉर पोहोचत आहे. देशांतर्गत पुरवठा साखळी मजबूत करून भारताला 'आत्मनिर्भर' बनवण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत गरजेचा होता, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# जिन्सी पोलिसांची कारवाई; विनापरवाना अंमली पदार्थ बाळगणारा व्यक्ती मुद्देमालासहित जेरबंद

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर शहरातील जिन्सी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी विनापरवाना व बेकायदेशीररीत्या अंमली पदार्थ बाळगणाऱ्या एका व्यक्तीवर धडक कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ३२ हजार रुपयांच्या प्रतिबंधित औषधी गोळ्या आणि १० हजार रुपयांचा मोबाईल असा एकूण ४२ हजार रुपयांचा मुद्द्यामाल जप्त केला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे.



पोलिस ठाणे जिन्सी हद्दीतील गल्ली नं. १५, शरीफ कॉलनी येथे राहणारा एक व्यक्ती आपल्या घरी विनापरवाना व बेकायदेशीररीत्या विक्री करण्याकरिता अंमली पदार्थ बाळगून असल्याची खात्रीशीर माहिती बातमीदारामार्फत जिन्सी पोलिसांना मिळाली होती. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तात्काळ एक पथक तयार करून छापा टाकण्याचे नियोजन केले. जिन्सी पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार तसेच अन्न व औषध निरीक्षक अधिकारी व पंचांसह पोलिसांनी पत्त्यावर छापा मारला. यावेळी घरात झडती घेतली असता अतीक खान शफीक खान (वय ४० वर्षे, व्यवसाय - मजुरी, रा. गल्ली नं. १५, रोशन मस्जिद जवळ, शरीफ कॉलनी, किराडपुरा हा मिळून आला. त्याच्या घराची व अंगझडती घेतली असता, घरातील दुसऱ्या मजल्यावर सीढियोंच्या बाजूला एका प्लास्टिकमध्ये खालीलप्रमाणे मुद्द्यामाल आढळून आला. पोलीस निरीक्षक गणेश ताठे, सर्जेराव कानप, संदिप अमोल काकडे, सोहेल पठाण, अजहर शेख, गोरखनाथ राठोड, प्रियंका भिवसने तसेच मनोज पैठणे यांनी केली आहे.

## ग्रामपंचायतींच्या कारभाराला मिळणार गती; मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीला मंजुरी

**मुंबई :** मुदत संपलेल्या, मात्र प्रशासकीय अडचणींमुळे निवडणुका अद्याप झालेल्या नसलेल्या ग्रामपंचायतींच्या कारभाराला आता गती मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार अशा ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याबाबत अधिसूचना जारी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार सुरळीत ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. अधिसूचनेनुसार, ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे आणि प्रशासकीय कारणांमुळे अद्याप निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, अशा ग्रामपंचायतींवर विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (आरोग्य), विस्तार अधिकारी (शिक्षण), विस्तार अधिकारी (पंचायत) किंवा अन्य शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करता येणार आहे.

## तर ती भूमिका मराठा समाज आता कदापि सहन करणार नाही : विखे पाटील

**शिर्डी (प्रतिनिधी) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळातच मराठा समाजाला न्याय देणारे निर्णय झाले आहेत. आतापर्यंत असे निर्णय कधीही झालेले नव्हते. मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केलेल्या सर्वच मुद्द्यांवर सरकारने सकारात्मक भूमिका घेऊन एक पाऊल पुढे टाकले आहे. झालेल्या निर्णयांबाबत त्यांनीही आता समाधान व्यक्त करून सकारात्मक प्रतिसाद दिला पाहिजे. सरकार निर्णय घेत असताना त्यांनीही दोन पावले पुढे टाकावीत, असे आवाहन जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

माध्यमांशी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, सरकारने घेतलेल्या निर्णयांप्रमाणे निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांनी आजपासून मराठवाड्यातील दौरे सुरू केले असून, त्यांच्या दौऱ्यातूनही वस्तुस्थिती समोर येईल. यापूर्वी या सर्व नोंदी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली शोधल्या गेल्या होत्या. दाखले देण्यासाठी सरकारने तयार केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा आधार घेऊन दाखले देण्याच्या प्रक्रियेलाही गती यावी, म्हणून मंडल स्तरावर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी लोकांनीही अर्ज केले पाहिजेत. ५८ लाख नोंदी ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये लावण्यात आल्या असल्याचे ना. विखे पाटील यांनी सांगितले. मराठा समाजाला न्याय मिळावा, म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोन नेत्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. यापूर्वी मराठा समाजाच्या हिताचे निर्णय कधीही झाले नव्हते. ज्यांनी निर्णय घेतले, त्यांनाच नावे ठेवली जात असतील किंवा त्यांच्या विरोधात काही विधाने होत असतील, तर मराठा समाजही ते आता खपवून घेणार नाही. सरकार सकारात्मक नसते, तर वेगळी गोष्ट होती; परंतु मनोज जरांगे पाटील यांनी वेळोवेळी उपस्थित केलेल्या सर्वच मुद्द्यांवर सरकारने एक पाऊल पुढे टाकले आहे.

## "शाल जोडे"




# उच्च न्यायालयाच्या आदेशाला हरताळ! प्राचार्यांकडून प्राध्यापकाला महाविद्यालयात प्रवेशास मज्जाव

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

घनसावंगी

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने याचिकाकर्त्या प्राध्यापकावर कोणतीही प्रतिकूल कारवाई न करण्याचे स्पष्ट निर्देश दिले असतानाही, घनसावंगी येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या प्राचार्यांनी न्यायालयाच्या आदेशाला थेट केराची टोपली दाखवल्याचा प्रकार समोर आला आहे. उच्च न्यायालयाचे संरक्षण कार्यरत असतानाही प्राध्यापकाला कर्तव्यावर रुजू होण्यापासून रोखण्यात आले असून, उलट पोलिसांत तक्रार करण्याची धमकी देण्यात आल्याने हा न्यायालयाचा जाणूनबुजून अवमान असल्याचा गंभीर आरोप होत आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ३१ ऑगस्ट रोजी या प्रकरणात सुनावणी करताना, याचिकाकर्ते डॉ. भागवत अंकुश कराडकर यांच्याविरुद्ध कोणतीही प्रतिकूल कारवाई करू नये, असे स्पष्ट अंतरिम संरक्षण दिले होते. या कायदेशीर संरक्षणाचा आधार घेत डॉ. कराडकर यांनी दिनांक ५ सप्टेंबर रोजी घनसावंगी येथील मॉडेल डिग्री कॉलेज मध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून आपली कर्तव्ये पार पाडण्याची आणि हजेरी नोंदवण्याची तयारी दर्शवली होती.

तत्पूर्वी त्यांनी प्राचार्यांकडे लेखी अर्ज सादर करून, उच्च न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ देत सेवेत सामावून घेण्याची आणि नियमित उपस्थिती नोंदवण्याची विनंती केली होती.



परंतु, महाविद्यालय प्रशासनाने न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली करत त्यांना महाविद्यालयात येण्यास सक्त मनाई केली. एवढेच नव्हे तर, महाविद्यालय परिसरात फिरल्यास किंवा हजेरीचा आग्रह धरल्यास पोलिसांत गुन्हे दाखल करण्याची धमकी दिल्याचेही डॉ. कराडकर यांनी सांगितले. न्यायालयाचे स्पष्ट आदेश असताना कर्तव्यावर जाण्यापासून रोखणे आणि पोलिस कारवाईचा धाक दाखवणे, हे न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली करणारे आणि अवमान करणारे असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणात प्रशासनाच्या भूमिकेवर मोठा संशय निर्माण होत असून, डॉ. कराडकर यांनी एका गंभीर मुद्द्याकडे लक्ष वेधले आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, याच महाविद्यालयात अगदी समान परिस्थितीत नियुक्त झालेले इतर व्याख्याते बालासाहेब वरखुंडे आणि रुचशबाबा शशंदे यांना विनाअट आपली सेवा बजावण्याची आणि नियमित उपस्थिती नोंदवण्याची परवानगी दिली जात आहे. मात्र, याच न्यायालयात कायदेशीर लढा देणाऱ्या डॉ. कराडकर यांच्या बाबतीत मात्र जाणूनबुजून भेदभाव केला जात असून त्यांना वेठीस धरले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.व

उच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश अस्तित्वात असताना त्याची अंमलबजावणी न करणे, उलटपक्षी याचिकाकर्त्याला अपमानित करून पोलिस कारवाईची धमकी देणे ही न्यायालयाच्या आदेशाची थेट अवहेलना असल्याचे डॉ. कराडकर यांनी स्पष्ट केले आहे. न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध आता उच्च न्यायालयात 'अवमान याचिका' (Contempt Petition) दाखल करण्याची जोरदार तयारी करण्यात येत आहे. न्यायालयाचे आदेश पायदळी तुडवणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी यादरवारे केली जाणार आहे. दरम्यान, आपण कायद्याचा व न्यायालयाच्या प्रत्येक आदेशाचा आदर करण्यास पूर्णपणे बांधील असून, योग्य आदेशानुसार तात्काळ कर्तव्यावर रुजू होण्यास तयार असल्याचे डॉ. भागवत कराडकर यांनी शेवटी स्पष्ट केले आहे. या गंभीर प्रकारामुळे शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

# सं पा द की य

## पाच टक्के आरक्षणाचे सुधारित धोरण मंजूर

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय सेवेत नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी असलेल्या ५ टक्के आरक्षणाला आता एकसंध आणि प्रभावी धोरणाची जोड मिळणार आहे. विविध शासन निर्णयांमधील तरतुदींमध्ये सुसूत्रता आणत खेळाडू आरक्षणाचे सुधारित धोरण लागू करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिली आहे. या नव्या धोरणामुळे बोगस प्रमाणपत्रांना मोठा आळा बसणार असून गुणवंत खेळाडूंना न्याय मिळण्याचा मार्ग अधिक सुकर झाला आहे. शासकीय, निमशासकीय आणि शासनाकडून निधी किंवा अनुदान मिळणाऱ्या विविध संस्थांमधील गट-अ, ब, क आणि ड संवर्गातील सरळसेवेच्या पदांसाठी हे ५ टक्के समांतर आरक्षण लागू राहणार आहे. यामध्ये मंत्रालयीन विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, महानगरपालिका, शासकीय उपक्रम, मंडळे, महामंडळे, विद्यापीठे, अनुदानित शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा, सहकारी संस्था आणि शासनमान्य स्वयंसेवी संस्थांचा समावेश करण्यात आला आहे. सुधारित धोरणातील सर्वात महत्त्वपूर्ण बदल म्हणजे क्रीडा ई-प्रमाणपत्राची स्वयंचलित डिजिटल कार्यप्रणाली असणार आहे. स्पर्धा संपल्यानंतर सात दिवसांच्या आत निकाल डिजिटल स्वाक्षरीसह अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले असून, ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे या डेटामध्ये फेरफार करता येणार नाही. ऑटोमेटेड क्रिप्टोग्राफिक हॅशच्या माध्यमातून प्रमाणपत्राची सत्यता तत्काळ पडताळता येणार आहे. या धोरणात आरक्षणासाठी पात्र खेळांची व्याप्तीही स्पष्ट करण्यात आली असून, २००५ नंतर सलग तीन उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये समाविष्ट असलेले खेळ तसेच कबड्डी, खो-खो, बुद्धिबळ, मल्लखांब आणि क्रिकेट या देशी खेळांचाही समावेश करण्यात आला आहे. गट-अ ते गट-ड पदांसाठी वेगवेगळे पात्रता निकष निश्चित करण्यात आले असून, ऑलिम्पिकपासून ते राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पदवी विजेत्या खेळाडूंना त्यांच्या पात्रतेनुसार विविध गटांमध्ये संधी मिळणार आहे. दरम्यान, या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंना क्रीडा प्रमाणपत्राची वैधता तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले असून, यापूर्वीच्या निर्णयांनुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनाही नव्या शासन निर्णयाच्या तारखेपासून तीन महिन्यांत प्रमाणपत्र पडताळून घेणे अनिवार्य असणार आहे.

# 'नेत्रम' ॲपच्या माध्यमातून शिवनेरीतील बांधकामांची तपासणी; अनधिकृत बांधकामांवर सात दिवसांत कारवाई - ॲड. आशिष शेलार

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी असलेल्या शिवनेरी किल्ल्याचे ऐतिहासिक आणि जागतिक वारसा महत्त्व लक्षात घेता, किल्ला परिसरातील अनधिकृत बांधकामे, कबर, दर्गे तसेच इतर संरचनांची तातडीने वस्तुनिष्ठ तपासणी करावी आणि त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले. शिवनेरी किल्ला आणि परिसरातील सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी ॲड. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली आज संबंधित अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीला जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे (ASI) अधिकारी, पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, तहसीलदार तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी उपस्थित होते. बैठकीत किल्ल्याच्या ऐतिहासिक वारशाचे जतन आणि परिसरातील अनधिकृत संरचनांबाबत पुढील कार्यवाहीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शिवनेरी किल्ला हा जागतिक वारशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, संबंधित वास्तूच्या संरक्षित व बफर झोनमध्ये कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम अथवा संरचना उभारली जाणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना मंत्री ॲड. शेलार यांनी दिल्या. किल्ला परिसरातील कबर, दर्गा तसेच इतर संरचना नेमक्या कोणत्या कालखंडात निर्माण झाल्या, त्याबाबत महसूल अभिलेख, उपलब्ध ऐतिहासिक दस्तऐवज तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वस्तुनिष्ठ अहवाल तयार करण्याचे निर्देश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

या संरचना पूर्वीपासून अस्तित्वात होत्या की अलीकडच्या काळात निर्माण करण्यात आल्या, याची निश्चित पडताळणी करण्याच्या सूचना मंत्री शेलार यांनी दिल्या.

'नेत्रम' ॲपच्या माध्यमातून संरचनांची तपासणी

या तपासणीसाठी केंद्र सरकारच्या 'नेत्रम' ॲपचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले. उपग्रह छायाचित्रांच्या आधारे एखादी संरचना कोणत्या कालावधीपासून अस्तित्वात आहे, याबाबत माहिती मिळविण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या 'महास्टॅट' यंत्रणेशी समन्वय साधून उपलब्ध तांत्रिक माहितीचा वापर करून संरचनांची कालानुक्रमिक पडताळणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शिवनेरी परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित संरचना जागतिक वारसा स्थळाच्या बफर झोनच्या नियमांचे उल्लंघन करतात का; याबाबत अहवाल सादर करावा, असेही निर्देश देण्यात आले. भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी या संपूर्ण परिसराला भेट देऊन पाहणी करून यातील काही गंभीर बाबी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्यानुसार ही बैठक घेण्यात आली होती. आज या बैठकीत उपस्थित राहून त्यांनी सदर बाबी त्यांनी बैठकीत मांडल्या.

सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश

शिवनेरीच्या वारसा संवर्धनाशी संबंधित बाब अत्यंत गांभीर्याने घेऊन संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी. अनधिकृत असल्याचे निष्पन्न झालेल्या संरचनांबाबत नियमानुसार नोटीस बजावून, त्यावर सात दिवसांच्या आत पुनरावलोकन करून पुढील कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले.

शिवनेरी किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी निगडित असलेला अत्यंत महत्त्वाचा वारसा असून, त्याचे पुरातत्त्वीय आणि जागतिक वारसा मूल्य अबाधित ठेवणे ही सर्व संबंधित यंत्रणांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत बांधकामाकडे दुर्लक्ष केले जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश मंत्री शेलार यांनी दिले आहेत.

# लायन्स क्लबच्या 'त्रिनाद' कॉन्क्लेव्हमध्ये नेतृत्वाचा बुलंद आवाज

### समाजसेवा, नेतृत्व विकास आणि संघटनात्मक बळकटीकरणावर भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ एच २ अंतर्गत रिजन १, २ आणि ३ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'गॅट कॉन्क्लेव्ह – त्रिनाद' उत्साहपूर्ण वातावरणात चिकलठाणा येथील खिवंसरा बिझनेस सेंटरमध्ये संपन्न झाले. 'तीन रिजन • एक आवाज • एक मिशन' या ध्येयमंत्राने झालेल्या या परिषदेत नेतृत्व विकास, समाजसेवेचा विस्तार आणि संघटनात्मक बळकटीकरणावर विशेष भर देण्यात आला.

परिषदेच्या प्रास्ताविकात ला. किशोर ललवाणी यांनी, "गॅट कॉन्क्लेव्ह म्हणजे खऱ्या अर्थाने नेतृत्व घडवणारी शाळा आहे," असे सांगत परिषदेमागील उद्देश स्पष्ट केला. त्यांच्या नियोजन, दूरदृष्टी आणि प्रेरणेतून या त्रि-रिजनल कॉन्क्लेव्हचे प्रभावी आयोजन करण्यात आले. रिजन १ चे ला. आनंद देसाई आणि रिजन ३ च्या ला. डॉ. अश्विनी आर. जैस्वाल यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन प्रांतपाल ला. राहुल औसेकर यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी ला. नरेंद्र भंडारी आणि ला. क्षमा गांधी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रमांची व्याप्ती वाढविण्यासोबतच सक्षम नेतृत्व तयार करणे आणि संघटनेला अधिक बळकटी देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. यावेळी उपप्रांतपाल ला. सुप्रिया कोतवाल, ला. सुनील देसरडा, फॅकल्टी ला. क्षमा गांधी, माजी प्रांतपाल ला. राजेश राऊत आणि ला. तनसुख झांबड यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सर्व झोन चेअरपर्सन आणि डिस्ट्रिक्ट टीमचे पदाधिकारी उपस्थित होते.

परिषदेतील विविध सत्रांमध्ये ला. रवी कडगे (जीएमटी), ला. नंदकिशोर मालपाणी (जीएलटी), ला. जयदीप घुगे (जीएसटी), ला. संजीव गुप्ता (गेट) आणि ला. मुरलीधर उपाध्याय (एलसीआयएफ) यांनी सदस्यांना मार्गदर्शन केले. नेतृत्व क्षमता, संघटनात्मक कार्यपद्धती आणि समाजसेवेच्या प्रभावी नियोजनाबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ला. सुहास लंके यांनी ओघवत्या शैलीत केले. उत्स्फूर्त सहभाग आणि नियोजनबद्ध आयोजनामुळे 'त्रिनाद' कॉन्क्लेव्ह लायन्स क्लबच्या पदाधिकारी व सदस्यांसाठी प्रेरणादायी ठरले.

## गिरगांव चा राजा ने खोले 99वें गणेशोत्सव के द्वार

मुंबई : मुंबई में गणेश चतुर्थी की तैयारियों के बीच, शहर के प्रमुख और लंबे समय से चली आ रही गणेश मंडलों में से एक गिरगांव चा राजा ने अपने 99वें गणेशोत्सव के लिए श्री मंदिर ऐप के साथ साझेदारी की है। इसके जरिए देशभर के श्रद्धालु, जो पंडाल में व्यक्तिगत रूप से उपस्थित नहीं हो सकते, 11 दिवसीय उत्सव के दौरान पूजा में भाग ले सकेंगे, चढ़ावा अर्पित कर सकेंगे और नाम संकल्प एवं सेवा में शामिल हो सकेंगे। इस वर्ष मंडल में लगभग 24 फीट ऊंची और 3.5 टन वजनी पर्यावरण-अनुकूल गणेश प्रतिमा विराजमान होगी, जो मुंबई की सबसे ऊंची पर्यावरण-अनुकूल गणेश प्रतिमा है। भारत के सबसे बड़े भक्ति मंच श्री मंदिर ऐप ने 4 करोड़ से अधिक डाउनलोड का आंकड़ा पार कर लिया है और भारत सहित विदेशों में लाखों श्रद्धालु इस पर भरोसा करते हैं। यह प्लेटफॉर्म 50 लाख मासिक सक्रिय उपयोगकर्ताओं तक पहुंचता है, जिनमें 5 लाख दैनिक सक्रिय उपयोगकर्ता शामिल हैं, और भारतभर के 100 से अधिक मंदिरों के साथ जुड़ा हुआ है। श्री मंदिर ऐप तकनीक के माध्यम से भौगोलिक दूरी के बावजूद श्रद्धालुओं को मंदिरों से जुड़े रहने और धार्मिक अनुष्ठानों में भाग लेने में मदद करता है, जबकि पूजा, चढ़ावा और अन्य अनुष्ठान मंदिरों एवं धार्मिक संस्थानों में उनकी परंपराओं के अनुसार ही संपन्न किए जाते हैं।

## पहिल्याच दिवशी 100 ईव्ही ची डिलिव्हरी

जळगाव : कायनेटिक वॅट्स अँड वोल्ट्स लिमिटेड, भारतातील इलेक्ट्रिक मोबिलिटी बाजारपेठेत सातत्याने आपली उपस्थिती विस्तारत असलेला आयकॉनिक दुचाकी ब्रँड, यांनी 15 ऑगस्ट 2026 रोजी जळगावमध्ये आपल्या नवीन सुविधेचे उद्घाटन केले. महाराष्ट्रातील वाढत्या रिटेल आणि ग्राहक नेटवर्कच्या विस्ताराच्या दिशेने हे आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.उद्घाटनाला ग्राहक, भागीदार आणि स्थानिक समुदायाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उद्घाटनाच्या दिवशी 100 कायनेटिक इलेक्ट्रिक स्कूटरची डिलिव्हरी करण्यात आली. यापैकी 50 स्कूटर जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन च्या सदस्यांना, तर आणखी 50 स्कूटर ग्राहकांना वितरित करण्यात आल्या. यावरून या भागात कायनेटिक च्या इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांबद्दल असलेली मजबूत उत्सुकता आणि वाढती स्वीकारार्हता स्पष्ट होते.

## संत सेना महाराजांच्या विचारांतून समाजाने एकतेचा मार्ग स्वीकारावा



दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजी नगर प्रतिनिधी संत परंपरेतील महान संतश्रेष्ठ सद्गुरू संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त खुलताबाद शहरातील बाजार गल्ली येथील सामाजिक सभागृहात संत सेना महाराजांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्रित येत संत सेना महाराजांच्या विचारांचे स्मरण केले तसेच समाजाच्या विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

संत सेना महाराजांनी आपल्या कार्यातून समाजाला भक्ती, समता, सेवा आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांची आजच्या काळातही तितकीच आवश्यकता असून, नव्या पिढीने त्यांच्या शिकवणुकीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजात बंधुभाव, एकोपा आणि सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले.

संत सेना महाराजांचे कार्य आणि विचार हे समाजासाठी सदैव प्रेरणादायी आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी समाजाने एकजुटीने कार्य करण्याची गरज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

याप्रसंगी शहराध्यक्ष शिवाजी घोडके, उपाध्यक्ष सोमीनाथ लिंगायत, चंद्रकांत सोनवणे,गोपीनाथ घोडके, यश घोडके, सतीश वाघ, सतीश बोराडे, नारायण बोराडे, बाबासाहेब बोराडे, गौरव घोडके, गौरव लिंगायत, गणेश वर्पे, उद्धव लिंगायत,बाळू लिंगायत यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पूर्वतयारीला वेग; आयुक्तांकडून सिद्धार्थ उद्यान परिसराची पाहणी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर

आगामी १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या 'मराठवाडा मुक्ती संग्राम दिन' सोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी आज सिद्धार्थ उद्यान परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यंदाच्या मुख्य सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण संपन्न होणार आहे.

या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी कार्यक्रमाच्या तयारीबाबत प्रशासकीय यंत्रणेची बैठक घेत सविस्तर पाहणी केली. यावेळी मान्यवरांचे आगमन व निरोप व्यवस्था, हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्याची सोय, व्यासपीठ, मंडप, आसनव्यवस्था, ध्वजारोहण आणि संपूर्ण परिसर स्वच्छता यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. नागरिकांना व पाहुण्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून विद्युत व्यवस्था, ध्वनी यंत्रणा आणि इतर सुविधा तातडीने व दर्जेदार स्वरूपात पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी संबंधित विभागांना दिले.

पाहणी दरम्यान हुतात्मा स्तंभ परिसरातील लक्ष्मीकांत तांबोळी यांनी लिहिलेल्या मराठवाडा गीताची कोरीव शिळा जुनी झाल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आले. याची गंभीर दखल घेत सदर शिळा नव्या स्वरूपात, अतिशय सुबक व शोभनीय पद्धतीने पुन्हा तयार करून त्याच परिसरात सन्मानाने बसविण्याचे आदेश त्यांनी दिले.


मराठवाडा मुक्ती संग्राम दिन हा या प्रदेशाच्या इतिहासातील अत्यंत भावनिक आणि अभिमानाचा दिवस असल्यामुळे सर्व कामे अत्यंत नियोजनबद्ध आणि दर्जेदार असावीत, अशी सूचना आयुक्तांनी केली. तसेच, सर्व तयारीची अंतिम पाहणी १६ सप्टेंबरच्या रात्री केली जाईल, असे स्पष्ट करत विहित मुदतीत कामे पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

या पाहणी दौऱ्यात अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख नंदकिशोर भोंबे, मुख्य उद्यान अधिकारी डॉ. विजय पाटील, कार्यकारी अभियंता (विद्युत) मोहिनी वारभुवन यांच्यासह मनपाचे इतर प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## उत्तम हालचाल व निरोगी जीवनशैलीसाठी फिजिओथेरपी महत्वपूर्ण

छत्रपती संभाजीनगर,- फिजिओथेरपी ही केवळ वेदना कमी करण्यापुरती मर्यादित नाही. ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियेनंतरचे पुनर्वसन, क्रीडा दुखापती, न्यूरोलॉजिकल समस्या, स्नायू व सांध्यांशी संबंधित विकार तसेच विविध शारीरिक मर्यादांमध्ये फिजिओथेरपी महत्त्वाची भूमिका बजावते. रुग्णाला दैनंदिन कामे अधिक सहजपणे करण्याची क्षमता पुन्हा मिळवून देण्यासही याचा मोठा फायदा होतो. डॉ. विशाल कुटे, सेंटर हेड, मेडिकव्हर हॉस्पिटल्स म्हणाले, की"आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे, तर शरीराची हालचाल सक्षम असणे आणि दैनंदिन जीवन आत्मविश्वासाने जगता येणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आधुनिक उपचारपद्धतीमध्ये फिजिओथेरपीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. शस्त्रक्रियेनंतरचा पुनर्वसन कालावधी कमी करण्यापासून ते दुखापतीनंतर शरीराची कार्यक्षमता पूर्ववत करण्यापर्यंत फिजिओथेरपी रुग्णाच्या आरोग्यप्रवासात महत्त्वाची भूमिका बजावते. योग्य वेळी तज्ज्ञांचा सल्ला आणि नियमित फिजिओथेरपी घेतल्यास अनेक रुग्णांना पुन्हा सक्रिय आणि स्वावलंबी जीवन जगण्यास मदत होते."

## 'भगवान महावीरांना हृदयात स्थान द्या' : आचार्य हेमसागरजी



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आर्यनंदी कॉलनी, वेदांतनगर येथील १००८ श्री चंद्रप्रभू खंडेलवाल दिगंबर जैन मंदिरात आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या सान्निध्यात सुरू असलेल्या इंद्रध्वज महामंडल विधानामुळे परिसरात भक्तिमय आणि अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. प्रतिष्ठाचार्य अकलंक जैन यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक विधी सुरू असून भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत आहे. अशी माहिती मुख्य संयोजक संजय पापडीवाल यांनी दिली.

६ सप्टेंबर रोजी भगवान चंद्रप्रभूंच्या शांतिधारेचे सौभाग्य हर्षा प्रविणकुमार गंगवाल परिवार, जालना यांना, तर आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या पादप्रक्षालनाचे सौभाग्य शीला-संजयजी, संदेशजी व रितेशजी कासलीवाल परिवाराला लाभले. सायंकाळच्या आरतीचे सौभाग्य अल्का वर्धमानजी कासलीवाल परिवार, मुंबई यांना मिळाले.

विधानात विविध इंद्रांच्या भूमिकेत भाविक भक्तिभावाने सहभागी झाले. तसेच जलपान, शुद्ध भोजन व महाप्रसादीची व्यवस्था विविध दाते परिवारांच्या सहकार्याने करण्यात आली.

# जिंतूरमध्ये तीज महोत्सवाची उत्साहात सांगता

### दहा दिवस विविध कार्यक्रमांची रेलचेल; महिला, समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग



**जिंतूर :** समस्त गोर बंजारा समाजाच्या वतीने जिंतूर शहरात आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय तीज महोत्सवाची मंगळवारी (ता. ८) उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. पारंपरिक तीज संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करत या महोत्सवात विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल होती. महिला व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

महोत्सवाची सुरुवात ३० ऑगस्ट रोजी अविवाहित मुलींच्या हस्ते तीज पेरणीने झाली. त्यानंतर दररोज विविध कार्यक्रम घेण्यात आले. ३ सप्टेंबरला रमेश चव्हाण, स्वरूप साडी सेंटर यांच्या वतीने 'होम मिनिस्टर-खेळ पैठणीचा' कार्यक्रम झाला. ४ सप्टेंबरला सुधाकर जाधव यांच्या पुढाकारातून प्रसिद्ध कलाकार गीतांजलीबाई यांचा कार्यक्रम, तर ५ सप्टेंबरला महिलांसाठी संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात आली. ७ सप्टेंबरला डॉ. अतुल जाधव यांच्या पुढाकारातून लिंबाळा तांड्यातील महिला पथकांचा ढंभोळी कार्यक्रम व तीज पूजन झाले. दररोज सायंकाळी सात ते दहा या वेळेत संगीत रजनीने महोत्सवाची रंगत वाढविली.

महोत्सवासाठी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य रोहित नामदेव चव्हाण यांच्यासह रामराव, मुकुंद, नामदेव व विलास बंडूसिंग चव्हाण यांचे विशेष योगदान राहिले. महिलांचा सहभाग वाढावा यासाठी दहा दिवस अन्नदानाचीही व्यवस्था करण्यात आली.

समारोपप्रसंगी उपस्थित महिला, माता-भगिनी व समाजबांधवांचे तीज महोत्सव समितीच्या वतीने डी. यू. राठोड यांनी आभार मानले.

*चौकट*

*महिलांसाठी दहा दिवस अन्नदानाची व्यवस्था*

तीज महोत्सवात महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग राहावा तसेच त्यांना घरी स्वयंपाकाचा त्रास होऊ नये, यासाठी महोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत दररोज अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली होती. या उपक्रमाला समाजबांधवांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. डी. यू. राठोड, डॉ. ज्ञानेश्वर राठोड, संतोष काळू चव्हाण, सुधाकर जाधव, ॲड. विनोद राठोड, सचिन आडे, राहुल पवार, डॉ. अतुल जाधव, नकुल जाधव, प्रकाश सवेराम चव्हाण, स्वप्निल राठोड व नितीन जाधव यांनी अन्नदानासाठी योगदान देत सामाजिक बांधिलकी जपली. त्यांच्या सहकार्यामुळे महोत्सवात सहभागी होणाऱ्या महिला व समाजबांधवांसाठी दररोज भोजनाची व्यवस्था सुरळीतपणे पार पडली.

## सनी मुंगसे यांच्या स्मृतीनिमित्त ६१ जणांचे रक्तदान



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सनी मुंगसे यांच्या स्मृतीनिमित्त पहाडसिंगपुरा येथे ६१ जणांनी रक्तदानाने अभिवादन करून आठवणींना उजाळा दिला. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या विभागीय रक्तपेढीने सहकार्य केले.

एखाद्या व्यक्तीच्या स्मृती जतन करण्याचे अनेक मार्ग असतात. मात्र, समाजासाठी उपयुक्त आणि गरजूंच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणाऱ्या उपक्रमातून एखाद्या व्यक्तीचे स्मरण करणे ही अत्यंत प्रेरणादायी बाब आहे. सनी मुंगसे यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेले हे रक्तदान शिबिर केवळ एक कार्यक्रम नसून, त्यांच्या स्मृतींना वाहिलेली एक सामाजिक श्रद्धांजली होती. रक्तदानासारख्या पवित्र उपक्रमातून त्यांच्या स्मृतींचे स्मरण करण्यात आले. या उपक्रमातून समाजामध्ये एक सकारात्मक संदेश देण्यात आला. आपल्या प्रिय व्यक्तींच्या स्मरणार्थ केवळ औपचारिक कार्यक्रम आयोजित न करता समाजाच्या हितासाठी उपयुक्त असे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. रक्तदान, आरोग्य शिबिर, वृक्षारोपण, शैक्षणिक मदत आणि सामाजिक सेवा यांसारख्या उपक्रमांमधून व्यक्तीच्या स्मृती समाजहिताच्या कार्याशी जोडल्या जाऊ शकतात. याप्रसंगी घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, उपअधिष्ठाता डॉ. के. डी. गर्कल, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, प्राचार्य फुलचंद सलामपुरे यांच्यासह रक्तपेढीच्या इन्चार्ज डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. आदित्य, डॉ. सरिता, डॉ. जोहरा, नागनाथ पाटे, सामाजिक कार्यकर्ते कांबळे आदीसह सनी मुंगसे मित्रपरिवार आणि नातेवाईक उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणाची कार्यवाही गतिमान करा — जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

## परभणी राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणाची कार्यवाही गतिमान करा

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी, :** सर्वोच्च न्यायालयाने विहित कालमर्यादेत राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे काढण्याचे निर्देश दिले आहेत. या अतिक्रमणांमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये, यासाठी अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही अधिक गतिमान करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांनी दिले.

रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे काढण्याच्या दूरदृष्यप्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, वाहतूक पोलीस निरीक्षक दीपक दंतुलवार यांच्यासह कार्यकारी अभियंता तृप्ती नाग, अनिस खैरदी, गणेश क्षीरसागर, सागर तायडे, अमित उबाळे दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ते हद्दीतील अतिक्रमणे तात्काळ हटविण्याच्या सूचना देताना जिल्हाधिकारी चव्हाण म्हणाले की, अतिक्रमण हटविण्याच्या कार्यवाहीत हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अभियंत्यांविरोधात विभागीय चौकशीच्या नोटिसा बजावण्यात याव्यात. तसेच अतिक्रमण हटविल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. अतिक्रमणामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्यास संबंधितांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या सूचना पोलीस विभागाला देण्यात आल्या. तसेच अतिक्रमण हटविण्याच्या शासकीय कार्यवाहीत कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्यास नियमानुसार तातडीने कारवाई करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले.

अतिक्रमण हटविताना वीज जोडणी काढण्याची आवश्यकता असल्यास संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा कार्यवाहीत समावेश करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. या मोहिमेदरम्यान संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने घटनास्थळी उपस्थित राहून अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही वेगाने पूर्ण करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

सर्वोच्च न्यायालयाने विहित कालमर्यादेत राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे काढण्याचे निर्देश दिले आहेत. या अतिक्रमणांमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये, यासाठी अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही अधिक गतिमान करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांनी दिले.

रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे काढण्याच्या दूरदृष्यप्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, वाहतूक पोलीस निरीक्षक दीपक दंतुलवार यांच्यासह कार्यकारी अभियंता तृप्ती नाग, अनिस खैरदी, गणेश क्षीरसागर, सागर तायडे, अमित उबाळे दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ते हद्दीतील अतिक्रमणे तात्काळ हटविण्याच्या सूचना देताना जिल्हाधिकारी चव्हाण म्हणाले की, अतिक्रमण हटविण्याच्या कार्यवाहीत हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अभियंत्यांविरोधात विभागीय चौकशीच्या नोटिसा बजावण्यात याव्यात. तसेच अतिक्रमण हटविल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. अतिक्रमणामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्यास संबंधितांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या सूचना पोलीस विभागाला देण्यात आल्या. तसेच अतिक्रमण हटविण्याच्या शासकीय कार्यवाहीत कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्यास नियमानुसार तातडीने कारवाई करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले.

अतिक्रमण हटविताना वीज जोडणी काढण्याची आवश्यकता असल्यास संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा कार्यवाहीत समावेश करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. या मोहिमेदरम्यान संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने घटनास्थळी उपस्थित राहून अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही वेगाने पूर्ण करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# वनामकृवितील सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने 'विकसित भारत युवा नेते संवाद–2027' प्रश्नमंजुषेत सहभागी होण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी :**-वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागातर्फे महाविद्यालयातील सर्व पदवीपूर्व विद्यार्थी तसेच एनएसएस स्वयंसेवकांना युवा कार्य व क्रीडा मंत्रालयातर्फे आयोजित 'विकसित भारत युवा नेते संवाद–२०२७' (VBYLD 2027) या प्रश्नमंजुषेत उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन दिनांक ७ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले.

ही प्रश्नमंजुषा 'मेरा युवा भारत' (MY Bharat) पोर्टलच्या माध्यमातून आयोजित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांनी केवळ पाच मिनिटांचा वेळ देऊन या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

या प्रश्नमंजुषेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी मेरा युवा भारत (MY Bharat) पोर्टलवर नोंदणी अथवा लॉगिन करून आपला सहभाग नोंदवावा. या उपक्रमात सहभागी होण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर २०२६ आहे. त्यामुळे महाविद्यालयातील सर्व पदवीपूर्व विद्यार्थी आणि विशेषतः एनएसएस स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने या प्रश्नमंजुषेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

या प्रश्नमंजुषेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार असून, राष्ट्रीय स्तरावर आपले विचार आणि नेतृत्वगुण प्रदर्शित करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात येणाऱ्या 'विकसित भारत युवा नेते संवाद–२०२७' या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळू शकते. याशिवाय, पात्र एनएसएस स्वयंसेवकांना प्रजासत्ताक दिन संचलन–२०२७ साठी एनएसएस पथकाचा भाग होण्याची संधी उपलब्ध होऊ शकते.

याबाबत मेरा युवा भारत कार्यालयाचे कक्ष अधिकारी श्री. गजानन गाडेकर व समन्वयक श्री. दीपक खुळे यांनी महाविद्यालयातील उपस्थित विद्यार्थ्यांना या उपक्रमाची सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले.

सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. नीता गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर पुरी यांनी सर्व पदवीपूर्व विद्यार्थी व एनएसएस स्वयंसेवकांनी या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

# श्री गणेशा आरोग्याचा अभियानाचे 14 ते 25 सप्टेंबरदरम्यान आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

परभणी, -- गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना आरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६' राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील नोंदणीकृत गणेश मंडळांच्या ठिकाणी सामुदायिक आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री सचिवालयाच्या अधिनस्त मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत हे अभियान राबविण्याचे प्रस्तावित आहे.

गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येत असल्याने त्याच ठिकाणी आरोग्य तपासणी व आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या शिबिरांसाठी विविध शासकीय विभाग व यंत्रणांसह जिल्ह्यातील सेवाभावी सामाजिक संस्था, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये तसेच रुग्णालयांचे सहकार्य घेतले जाणार आहे. त्याद्वारे वैद्यकीय अधिकारी, पॅरामेडिकल कर्मचारी, आवश्यक निदानात्मक व उपचारात्मक साधने-साहित्य आणि पुरेशा प्रमाणात औषधांची उपलब्धता करून देण्यात येणार आहे.

मंडळांनी संपर्क साधावा

अभियानांतर्गत आरोग्य शिबिर घेण्यास इच्छुक असलेल्या सर्व नोंदणीकृत गणेश मंडळांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी ईपर यांनी केले आहे.

# पालकत्व अधिकाऱ्यांकडून आयुष्मान आरोग्य मंदिरांची पाहणी

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** शहरातील आयुष्मान आरोग्य मंदिर व नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रांमध्ये नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य सेवांचा नियमित आढावा घेण्यात येत आहे. त्याअनुषंगाने परभणी पालकत्व अधिकारी डॉ. पल्लवी पगडाल, साथरोगशास्त्रज्ञ

ज्ञानोबा भोसले, माध्यम अधिकारी (आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र छत्रपती संभाजीनगर) सय्यद तूराबूल हक यांनी नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र, दर्गा रोड आणि आयुष्मान आरोग्य मंदिर, रहमत नगर येथे भेट देऊन विविध आरोग्य सेवांची पाहणी केली.



भेटीदरम्यान पीसीओडी तपासणी, माता व बाल संगोपन, लसीकरण, क्षयरोग व कुष्ठरोग नियंत्रण, प्रयोगशाळेतील तपासण्या, एचएमआयएस नोंदणी, विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी तसेच संबंधित रेकॉर्डची पडताळणी करण्यात आली. यासोबतच आरोग्य संस्थांमधील स्वच्छता, अग्निसुरक्षा व्यवस्था, आरोग्य समित्यांचे कार्य, संसर्गजन्य आजारांवरील प्रतिबंधात्मक उपाययोजना, रजोनिवृत्ती व पीसीओडी संदर्भातील सेवा यांचीही पाहणी करण्यात आली.

सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, नोंदी व रेकॉर्ड अद्ययावत ठेवणे, आवश्यक तपासण्या वेळेत करणे आणि नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या.

आरोग्य संस्थांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कामकाज अद्ययावत ठेवून नागरिकांना आवश्यक आरोग्य सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून द्याव्यात, असे यावेळी सूचित करण्यात आले. यावेळी मनपा वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्पना सावंत,आरोग्य वैद्यकीय अधिकारी ,कर्मचारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ उपस्थित होते.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त सिद्धार्थ उद्यानात मुख्य शासकीय ध्वजारोहण

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त आगामी १७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील सिद्धार्थ उद्यानात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा संपन्न होणार आहे. या महत्त्वपूर्ण सोहळ्याच्या पूर्वतयारी व नियोजनाचा आढावा घेण्यासाठी आज विभागीय आयुक्त कार्यालयात एक उच्चस्तरीय बैठक पार पडली. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व संबंधित यंत्रणांना परस्पर समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले.

# मराठवाडा सह परभणी राष्ट्रीय कोरडा दुष्काळ जाहीर करा : नितीन जाधव गोगलगावकर

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :**-राष्ट्रजन फाउंडेशन परभणी महाराष्ट्र च्या वतीने महाराष्ट्र राज्य हे कृषी प्रधान राज्य आहे यामध्ये मराठवाडा विभागामध्ये पावसाचे प्रमाण कमी झाले आहे पाऊस एक महिना झाला जवळपास पडला नाही बळीराजाचे शेतकऱ्याचे पिकाचे खूप मोठे नुकसान झाले आहे सर्व पिके वाळून जात आहेत सोयाबीन कापूस तूर उडीद मूग मका व भाजीपाला फळभागे ऊस सर्व प्रकारचे पीक आहे उन्हामुळे वाढत आहे पाऊस न पडल्यामुळे सर्व पिकाची नासाडी नुकसान वाळून जात आहे म्हणून प्रशासनाने कोरडा दुष्काळ जाहीर करावा सरसकट पंचनामा न करता पिक पाणी न करता डायरेक्ट शेतकऱ्यांना आर्थिक मदत व कोरडा दुष्काळ एकरी पन्नास हजार रुपये आर्थिक मदत जाहीर करावे परभणी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री कृषी मंत्री सर्व आपत्तीकालीन विभागाकडे अशी मागणी करण्यात येत आहे की मराठवाडा हा राष्ट्रीय कोरडा दुष्काळ म्हणून जाहीर करावा विशेष करून परभणी जिल्हा सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ 50 हजार जाहीर करावी आर्थिक मदत त्यांच्या बँकेच्या खात्यात जमा करावी अशी मागणी राष्ट्रजन फाउंडेशन अध्यक्ष शेतकरी मित्र नितीन जाधव गोगलगावकर, राष्ट्र जन फाउंडेशन मराठवाडा संपर्कप्रमुख डॉ.अशोक पवार यांची उपस्थितीत मागणी करण्यात आली अशी माहिती शेतकरी मित्र नितीन जाधव गोगलगावकर यांना पत्रकाद्वारे माहिती दिली



# जिल्हा परिषद केंद्रीय उर्दू प्राथमिक शाळेत बक्षीस वितरण व सिरत-उन-नबी कार्यक्रम उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

**शिवना प्रतिनिधी :** जिल्हा परिषद केंद्रीय उर्दू प्राथमिक शाळा, शिवना येथे बक्षीस वितरण समारंभ व सिरत-उन-नबी ﷺ कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.



कार्यक्रमास मा. शाकीर सर, मुख्याध्यापक सलीम उर्दू शाळा, मा. मकसूद सर, इरफान भाई, अल्ताफ सर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इम्रान कुरेशी साहेब, उपाध्यक्ष शेख अखलाक साहेब यांच्यासह समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सिरत-उन-नबी ﷺ विषयावर सुंदर भाषणे, मनोगते व विविध कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. पैगंबर हजरत मोहम्मद ﷺ यांच्या जीवनातील आदर्श, प्रेम, बंधुभाव, प्रामाणिकपणा, दया आणि मानवतेचा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून प्रभावीपणे मांडला.

तसेच शैक्षणिक, क्रीडा व विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत उपस्थित मान्यवरांनी त्यांना भविष्यातही उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद सादी सर व आयेशा बाजी यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. त्यांच्या उत्कृष्ट सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमाला सुंदर व शिस्तबद्ध स्वरूप प्राप्त झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व पालकांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांचा उत्साह, पालकांची उपस्थिती आणि शिक्षकांचे नियोजन यामुळे कार्यक्रम आनंददायी व संस्मरणीय ठरला.

# 33 वर्षांच्या प्रदीर्घ टपाल सेवेनंतर विजया रेगुलवार यांचा भावपूर्ण निरोप



**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** टपाल विभागात तब्बल ३३ वर्षे प्रदीर्घ सेवा बजावल्यानंतर सौ. विजया डॉ. दत्तात्रय रेगुलवार या सेवेतून निवृत्त झाल्या. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त जुनाबाजार पोस्ट ऑफिसमध्ये छोटेखानी मात्र भावपूर्ण निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी मंचावर अधीक्षक जी. हरिप्रसाद, सीनियर पोस्टमास्तर सुनील कोळी, प्रकाश अहिरे, डॉ. दत्तात्रय रेगुलवार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहदेव सातपुते यांनी केले.

सौ. विजया रेगुलवार यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात सहकाऱ्यांशी मनमिळाऊपणे व आपुलकीने संबंध जपले. त्यांच्या शांत, प्रेमळ व सहकार्याच्या स्वभावामुळे त्या टपाल विभागातील सहकाऱ्यांमध्ये विशेष लोकप्रिय होत्या. त्यामुळे त्यांच्या सेवानिवृत्तीच्या प्रसंगी अनेक सहकाऱ्यांना भावुक होऊन निरोप द्यावा लागला.

कार्यक्रमात रणजीत चव्हाण, देवेंद्र परदेशी तसेच महिला व पुरुष कर्मचाऱ्यांनी मनोगत व्यक्त करून सौ. रेगुलवार यांच्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या कार्याचे कौतुक करताना सर्वांनी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी आरोग्य, आनंद व सुख-समृद्धीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी सौ. विजया रेगुलवार यांनीही आपल्या भावपूर्ण मनोगतात सेवाकाळातील आठवणी व्यक्त केल्या. टपाल विभागातील सहकाऱ्यांनी दिलेले प्रेम, सहकार्य आणि जिव्हाळा आयुष्यभर स्मरणात राहील, असे सांगताना त्या भावुक झाल्या.

कार्यक्रमास जुनाबाजार पोस्ट ऑफिसमधील महिला व पुरुष कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहकाऱ्यांनी पुष्पगुच्छ व शुभेच्छा देत सौ. विजया रेगुलवार यांना भावपूर्ण निरोप दिला.

# सॅमसंगकडून आकर्षक फेस्टिव्ह ऑफर्स जाहीर

छत्रपती संभाजीनगर,- - सॅमसंगने आज भारतातील सणासुदीच्या हंगामापूर्वी आपल्या फ्लॅगशिप गॅलेक्सी टॅब एस१०+ टॅब्लेटवर आकर्षक ऑफर्स जाहीर केल्या आहेत. गॅलेक्सी टॅब एस१०+ मध्ये अत्याधुनिक हार्डवेअर आणि एआय-संचालित वैशिष्ट्ये आहेत, ज्यामुळे काम, मनोरंजन आणि स्मार्ट होम व्यवस्थापनासाठी वैविध्यपूर्ण डिवाईस शोधणाऱ्या व्यावसायिक, सर्जनशील व्यक्ती आणि तंत्रज्ञानप्रेमींसाठी हा टॅब योग्य पर्याय ठरतो.गॅलेक्सी टॅब एस१०+ मध्ये ३१.४७ सेमी डायनॅमिक एएमओएलईडी २एक्स डिस्प्ले अँटी-रिफ्लेक्टिव्ह तंत्रज्ञानासह येतो, जो ग्लेअर कमी करून आकर्षक व्हिज्युअल्स प्रदान करतो.

# बी द चेंज फाउंडेशन शिर्डी, यांचा पुरस्कार- 2026 गणेश लोखंडे यांना 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार 2026' प्रदान

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी
सोयगाव,दि.८ सप्टेंबर

सोयगाव तालुक्यातील डाभा येथील रहिवासी तथा भाजपाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्ष व माजी सरपंच गणेश एकनाथ लोखंडे यांना खाजगी तसेच सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६' या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




बी द चेंज फाउंडेशन, शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी शिर्डी येथे आयोजित कार्यक्रमात गणेश लोखंडे यांना सन्मानपत्र प्रदान करून त्यांच्या सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यात आला.

गणेश लोखंडे यांनी मागील पंधरा वर्षांपासून विविध क्षेत्रांत सामाजिक बांधिलकी जपत उल्लेखनीय कार्य केले आहे. शासन,प्रशासन,खाजगी क्षेत्र तसेच सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी निष्ठा,प्रामाणिकपणा,कार्यतत्परता आणि समाजहिताची जाणीव ठेवून विविध उपक्रम राबविले आहेत.

फर्दापूर येथे भीषण पाणीटंचाई निर्माण झालेल्या काळात त्यांनी सलग तीन महिने स्वखर्चाने टँकरद्वारे नागरिकांना पाणीपुरवठा केला. तसेच मोलखेडा येथे स्वतःच्या मोटार व पाइपलाइनद्वारे पाणीपुरवठा करून नागरिकांना दिलासा दिला. फर्दापूर गटात स्वच्छता अभियान, डाभा गावात स्वच्छता मोहीम, हागणदारीमुक्त अभियान, वृक्षलागवड, सॅनिटायझेशन, धूरफवारणी आणि शोषखड्डे निर्माण करण्यासह विविध सामाजिक उपक्रमांत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. देऊळगाव ते सावळदबारा रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमध्ये स्वखर्चाने मुरूम टाकून ते बुजविण्याचे कामही त्यांनी केले. ग्रामीण भागातील नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यासोबतच गरजेनुसार प्रत्यक्ष मदतीचा हात त्यांनी पुढे केला.

'चला बदल घडवू या...' या ध्येयाने कार्यरत असलेल्या बी द चेंज फाउंडेशनने त्यांच्या या कार्याची दखल घेत राज्यस्तरीय 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६'साठी त्यांची निवड केली.

# माई वृद्धाश्रमातील निराधार माईंना 'स्टेपिंग स्टोन्स'तर्फे मायेची ऊब




**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** समाजातील गरजू व निराधार घटकांप्रती संवेदनशीलता जपत स्टेपिंग स्टोन्स हायस्कूल, हर्सूल-सावंगी यांच्या वतीने माई वृद्धाश्रमातील अनाथ, निराधार माईंना ब्लँकेट व टॉवेलची भेट देण्यात आली. शाळेच्या वतीने दरवर्षी विविध सेवाभावी उपक्रम राबविले जातात. 'Be The Light!' या सेवाभावी भावनेतून स्टेपिंग स्टोन्स हायस्कूल, स्टेपिंग स्टोन्स इंटरनॅशनल व टॉडलर्स नर्सरी यांच्या वतीने शहरातील २०० ठिकाणी २०० समाजोपयोगी सेवा उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमांतर्गत माई वृद्धाश्रमाला भेट देऊन माईंशी संवाद साधत ब्लँकेट व टॉवेलची भेट देण्यात आली. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, सामाजिक जाणीव आणि माणुसकीची मूल्ये रुजावीत, या उद्देशाने शाळेच्या वतीने विविध आश्रम व स्वयंसेवी संस्थांना मदत केली जाते. या उपक्रमात शिक्षक कल्पना डोईफोडे, तसलीम हुसेन, श्याम राजपूत तसेच विद्यार्थी मोहम्मद इब्राहिम (इयत्ता नववी), निशी थेटे, अब्दुल अजीम, अर्णव बरनवाल व सर्विल लोखंडे सहभागी झाले.

यावेळी माई वृद्धाश्रमाच्या संचालिका मीरा वाघमारे व ऋत्वित वाघमारे यांनी स्टेपिंग स्टोन्सच्या शिक्षकवृंदांचा सत्कार करून त्यांच्या सामाजिक उपक्रमाबद्दल आभार मानले. या उपक्रमामुळे माईंना मायेची ऊब मिळण्यासोबतच विद्यार्थ्यांना माणुसकीची आणि सामाजिक बांधिलकीची शिकवण मिळाली.

# KGBV, NSCBAVच्या गृहप्रमुखांना निवासी शिक्षण व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

## सुरक्षित, संवेदनशील व विद्यार्थी-अनुकूल वातावरण निर्मितीवर भर; राज्यातील 10 जिल्ह्यांतील 32 गृहप्रमुख सहभागी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन संस्था (NIEPA), नवी दिल्ली आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (MPSP), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (KGBV) व नेताजी सुभाषचंद्र बोस आवासीय विद्यालय (NSCBAV) मधील गृहप्रमुखांसाठी पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ७ ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, छत्रपती संभाजीनगर येथे हे प्रशिक्षण सुरू आहे.

प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी NIEPAच्या प्रकल्प संचालक प्रा. सांत्वना मिश्रा, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे विभागीय अध्यक्ष अनिल साबळे, मिपाचे संचालक प्रकाश मुकुंद, MPSPच्या कार्यक्रम समन्वयक उज्वला वानखेडे तसेच मिपाच्या प्रशासन अधिकारी डॉ. ज्योती कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. सांत्वना मिश्रा यांनी गृहप्रमुखांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडताना सक्षम, सजग आणि संवेदनशील राहण्याची गरज व्यक्त केली. निवासी विद्यालयांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण कल्याणाची काळजी घेण्याबरोबरच त्यांच्यासाठी सुरक्षित आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

अनिल साबळे यांनी KGBV आणि NSCBAVच्या माध्यमातून शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर गेलेल्या अनेक मुला-मुलींना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात यश मिळाले असल्याचे सांगितले. या विद्यालयांमधून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

गृहप्रमुखांची प्राथमिक जबाबदारी विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, सर्वसमावेशक, काळजीवाहू, शिस्तबद्ध आणि शिकण्यासाठी अनुकूल निवासी वातावरण तयार करणे आहे. KGBV व NSCBAVमधील निवासी शैक्षणिक व्यवस्था अधिक गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी-अनुकूल करण्यासाठी गृहप्रमुखांची क्षमता वाढविणे, हा प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश आहे.

दरम्यान, माजी सचिव, केंद्रीय शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली संजय कुमार, अपर सचिव अर्चना शर्मा अवस्थी आणि NIEPAच्या कुलपती डॉ. शशिकला वंजारी यांनी प्रशिक्षणार्थींना व्हिडिओ संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या.

या प्रशिक्षणासाठी NIEPAतर्फे डॉ. इर्मा केरकेट्टा, डॉ. रश्मी चौहान, डॉ. संध्या वेद आणि डॉ. मनवेंद्र त्रिपाठी हे वरिष्ठ प्रकल्प सल्लागार तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित आहेत. प्रशिक्षणात चार जिल्हा समन्वयक (जेंडर) तसेच महाराष्ट्रातील १० जिल्ह्यांतील ३२ गृहप्रमुख सहभागी झाले आहेत.

# एमजीएममध्ये राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा उत्साहात; नेत्रदात्यांच्या कुटुंबीयांसह कॉर्निया प्रत्यारोपित रुग्णांचा सत्कार




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची संधी म्हणजे नेत्रदान. नेत्रदानाबाबत जनजागृती वाढवून अधिकाधिक नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा, या उद्देशाने एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या नेत्र विभागातर्फे २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबरदरम्यान राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

या कालावधीत पोस्टर, रांगोळी स्पर्धा आणि नाटकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी नेत्रदानाचे महत्त्व, गैरसमज आणि सामाजिक संदेश प्रभावीपणे मांडला. एमजीएम स्कूल ऑफ बायोमेडिकल सायन्सच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. नेत्र विभागातील डॉ. योगिता गायकवाड यांनी रेडिओच्या माध्यमातून नेत्रदानाची प्रक्रिया, महत्त्व आणि गैरसमज याबाबत जनजागृती केली. दुःखाच्या प्रसंगीही आपल्या आप्ताचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेणाऱ्या नेत्रदात्यांच्या कुटुंबीयांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. तसेच नेत्रदानातून मिळालेल्या कॉर्नियामुळे दृष्टी प्राप्त झालेल्या रुग्णांचाही विशेष सन्मान करण्यात आला. दाते आणि लाभार्थी यांना एकत्र आणणारा हा उपक्रम भावनिक व प्रेरणादायी ठरला. यावेळी अवयवदानाचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.

एमजीएमच्या नेत्र विभागात २७ वर्षे समुपदेशक म्हणून कार्यरत उज्वला भगत यांचा प्रदीर्घ सेवेसाठी विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा, डॉ. प्रवीण सूर्यवंशी, डॉ. सुधीर कुलकर्णी, डॉ. अपर्णा कक्कड, डॉ. क्षितिजा गाडेकर, डॉ. सारिका गाडेकर यांच्यासह डॉक्टर, कर्मचारी, विद्यार्थी, रुग्ण व नातेवाईक उपस्थित होते.

# शिवसेना धर्म सहाय्यता कक्षातर्फे तर्फे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील संत महंत चा मेळावा संपन्न

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता



***छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी:**दि ६ .छत्रपती संभाजी नगर येथील येथील रेल्वे स्टेशन. पैठण रोड येथvील मानभाव पंथांचे श्रीकृष्ण मंदिर या ठिकाणी सुदर्शन महाराज कपाटे व ह भ प काळे महाराज यांच्या नियोजनाखाली छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील संत महंत यांच्या प्रमुख उपस्थितीत मेळावा घेऊन प्रत्येक साधुसंतांच्या कामकाजाविषयी मंदिर मठ त्या ठिकाणी असलेल्या अडीअडचणी लेखी स्वरूपात घेऊन. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. व शिवसेना नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्यापर्यंत पोहोचून शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनेचा लाभ कसा मिळवून देण्यासाठी नियोजन पद्धतीने पुढाकार घेऊन

आपल्या भागातील सर्व साधुसंत महंत यांना एकत्रित करून त्या ठिकाणचा विकास करण्यात येईल

श्रीकृष्ण मंदिर* येथे झालेल्या या मेळाव्याला जिल्हाभरातील संत-महंत, वारकरी संप्रदायातील ह.भ.प. महाराज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ करा – न्यायमूर्ती संदीप शिंदे

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी




**परभणी :-** उपलब्ध कागदोपत्री नोंदी, वंशावळ व संबंधित पुराव्यांची नियमानुसार पडताळणी करून पात्र व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ व पारदर्शकपणे करावी, असे मार्गदर्शन न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांनी आज केले.

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबतच्या कार्यपद्धतीचा आढावा घेण्यासाठी न्यायमूर्ती श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठक झाली. विभागीय आयुक्त कार्यालयातून न्यायमूर्ती शिंदे यांनी बैठकीस मार्गदर्शन केले.

यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, सह आयुक्त मंजूषा मिसकर, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष व सदस्य दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

बैठकीत उपलब्ध कागदोपत्री नोंदी, वंशावळ पडताळणी, प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती तसेच स्थानिक पातळीवरील यंत्रणांच्या भूमिकेचा आढावा घेण्यात आला. उपलब्ध नोंदींच्या आधारे पात्र प्रकरणांची कार्यवाही नियमानुसार करण्याबाबत न्यायमूर्ती शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

हैदराबाद गॅझेटच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीत शासन निर्णयातील तरतुदींचा विचार करून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करावी. तसेच ग्राम व तालुका पातळीवरील यंत्रणांनी अर्जदारांना आवश्यक नोंदी उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये संबंधित प्रकरणांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. उपलब्ध नोंदींचा प्रभावी वापर करून पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत विभागातील जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील प्रमाणपत्र प्रक्रियेची सद्यस्थिती आणि करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.










**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911